एक्सचेंज ऑफर
घेऊन या कोणताही जुनी गॅस शेगडी आणि घेऊन जा नवीन गॅस शेगडी
उत्कृष्ट दर्जा, वाजवी किंमत
रेखा नॉव्हेल्टीज
गोखले नाका, रत्नागिरी 9890050275

Postal Reg. No. RTR/013/2021-2023
कोकणचे सर्वाधिक खपाचे दैनिक
रत्नागिरी टाइम्स
रत्नागिरी
वर्ष ४३ अंक २३३ • रत्नागिरी • सिंधुदुर्ग • रायगड • मुंबई • कोल्हापूर बुधवार, दि. १४ जून २०२३ • पृष्ठे १० • किंमत रु. ५.००

उत्कृष्ट दर्जा, वाजवी किंमत
एक्सचेंज ऑफर
फक्त रु.999/
घेऊन या कोणताही जुना मिक्सर आणि घेऊन जा नवीन मिक्सर
रेखा नॉव्हेल्टीज
गोखले नाका, रत्नागिरी 9890050275

कोकण मर्कन्टाईल को-ऑप. बँक लिमिटेड मल्टी स्टेट बँक. १९७३ पासून
नोंदणीकृत कार्यालय: १ ला मजला, हार्बर क्रेस्ट, माझगाव टी.टी. मुंबई ४०००१०. । दूरध्वनी : २३७२३७५३, २३७२९९६९, २३७२९९७० २३७२९९७१, २३७३४२०२, २३७३४३११. फॅक्स : २३७४८५८९ । वेबसाईट : www.kokanbank.net

विक्री सूचना

सर्वसाधारण जनता आणि विशेषतः कर्जदार, गहाणवटदार आणि जामिनदार यांना प्राधिकृत अधिकारी यांच्यातर्फे याद्वारे सूचना देण्यात येते की, कोकण मर्कन्टाईल को-ऑपरेटीव्ह बँक लिमिटेड यांच्याकडे गहाणवट असलेल्या निम्न उल्लेखित मालमत्तांचा सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ च्या तरतुदींन्वये दि. २३.०५.२०२३, दि. २७.१२.२०२२, दि. ०२.०६.२०२३ रोजी प्रत्यक्ष ताबा घेण्यात आला होता त्या राबिया जावेद पारकरचे कर्ज खाते क्र. ५०६९/३३३०२ करिताची सुरक्षित कर्ज रक्कम रु. ३०,०५,३३७.६५ (रुपये तीस लाख पाच हजार तीन्शे सदुतीस व पैसे पासष्ट मात्र), सौ. काझी नफिसा मुनिर अहमदचे कर्ज खाते क्र. ५०६९/३५८४० करिताची सुरक्षित कर्ज रक्कम रु. १९,९५,६७७.६० (रुपये एकोणीस लाख पंच्याण्णव हजार सहाशे सत्त्याहत्तर व पैसे साठ मात्र), श्री. अल्ताफ इस्माईल मिरकरचे कर्ज खाते क्र. ५०६९/२४२१५० करिताची सुरक्षित कर्ज रक्कम रु. २९,४१,६९६.८८ (रुपये एकोणतीस लाख एक्केचाळीस हजार सहाशे शहाण्णव व पैसे अठ्ठयाऐंशी मात्र) आणि ११.५०%, ११.५०% आणि ११.५०% दरसाल दराने पुढील व्याजाच्या वसुलीकरिता खाली नमूद केल्यानुसार निविदा सह जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्यात येईल.

मालमत्तेची विक्री फर्निचर आणि फिक्स्चर शिवाय "जसे आहे जेथे आहे आणि जसे आहे जे आहे" तत्वावर/शर्तीवर करण्यात येईल.

अ. क्र.	नाव	मालमत्तेचा तपशील	मालमत्तेची स्थिती	राखीव किंमत	इ.र.अ. (रु. मध्ये)	पाहणी दिनांक आणि वेळ	विक्री दिनांक आणि वेळ
 १ २ ३ ४	कर्ज खाते क्र. ५०६९/३३३०२ खेड शाखा सौ. पारकर राबिया जावेद - कर्जदार सौ. पारकर कुदसिया जावेद - जामीनदार श्री. पारकर महमद हनिफ युसूफ - जामीनदार श्री. पारकर जावेद युसूफ - जामीनदार	सदनिका क्र. २०२, १ ला मजला, शिश प्लाझा, गट क्र./एस. क्र. १८४ आणि हिस्सा क्र. १डी, सीटीएस क्र. ३०२७ बी, गाव खेड, ता. खेड, जिल्हा रत्नागिरी - ४१५७०९.	बँकेकडे भौतिक ताबा	१७,८०,०००/-	१,७८,०००/-	दि. १०.०७.२०२३ रोजी स. ११.०० ते सायं. ४.००	दि. २७.०७.२०२३ रोजी स. ११.०० वाजता
  १ २ ३ ४	कर्ज खाते क्र. ५०६९/३५८४० चिपळूण शाखा सौ. काझी नफिसा मुनिर अहमद - गहाणवटदार/कर्जदार श्री. मुल्ला अब्रार ए. कादिर - जामीनदार सौ. लांबे सायराबानू इम्तियाझ - जामीनदार श्री. काझी मुनिर अहमद युनूस - जामीनदार	चिपळूण नगरपरिषद, जिल्हा रत्नागिरीच्या हद्दीमधील एस क्र. २९२, मोजमाप ५११ चौ.फू. एच.एन.(१के)५, जुना मूल्यमापन क्र. ३४५९ आणि नवीन मूल्यमापन क्र. यूपीएनर१००१५८० येथे स्थित सदनिका क्र. बी-२०१ बी-विंग, तुलसी कुंज अपार्टमेन्ट, कवियल,.	बँकेकडे भौतिक ताबा	१५,००,०००/-	१,५०,०००/-	दि. १०.०७.२०२३ रोजी स. ११.०० ते सायं. ४.००	दि. २७.०७.२०२३ रोजी स. ११.०० वाजता
  १ २ ३ ४	कर्ज खाते क्र. ५०६९/२४२१५ रत्नागिरी शाखा श्री. मिरकर अल्ताफ इस्माईल - कर्जदार श्री. एच.एम.नगराज - जामीनदार श्री. वैभव मारुती पवार - जामीनदार श्री. हुस्नबानू अल्ताफ मिरकर - जामीनदार	उपनिबंधक रत्नागिरी, ता. आणि जिल्हा रत्नागिरी - ४१५६१२ यांच्या कार्यक्षेत्रामधील गाव मौजे नाचणे (रत्नागिरी नगरपरिषदेच्या नगरपालिका हद्दीमधील) येथील सर्व्हे क्र. ३८१, हिस्सा क्र. १/१+१/२+१/३ई, १/१+१/२+१/३आर, १/१+१/२+१/३डी, १/१+१/२+१/३एफ, १/१+१/२+१/३वाय, ¼/४५सी आणि सीटीएस क्र. ६३१/४, धारण केलेल्या अजिंक्यतारा रेसिडेन्सी या इमारतीमधील ५ व्या मजल्यावर स्थित (स्टिल्ट अप्पर) सदनिका क्र. ६०८, मोजमाप विक्रीयोग्य क्षेत्रफळ ९४० चौ. फू. (५१.४९ चौ.मी. + बाल्कनी ९.८९ चौ.मी. + टेरेस ३.०६ चौ.मी. + कपाट २.३२ चौ.मी.) क्षेत्रफळ.	बँकेकडे भौतिक ताबा	३१,२५,०००/-	३,१२,५००/-	दि. १०.०७.२०२३ रोजी स. ११.०० ते सायं. ४.००	दि. २७.०७.२०२३ रोजी स. ११.०० वाजता

इच्छुक खरेदीदार वर दिलेल्या दिनांक आणि वेळेस मालमत्तेची पाहणी करु शकतात.

वर उल्लेखिलेल्या स्थावर तारण मालमत्तेच्या बाबतीतील तपशील हे निम्नस्वाक्षरीकारांच्या सर्वोत्तम माहिती आणि ज्ञानानुसार नमूद केले आहेत तथापि सदर तपशिलामध्ये असलेल्या कोणत्याही त्रुटी, चुकीची नोंद किंवा काही वगळले गेले असल्यास त्याकरिता ते जबाबदार असणार नाहीत. जाहीर लिलावाच्या अटी आणि शर्ती :

१) विक्री खाली नमूद केलेल्या अटी आणि शर्तींनुसारच करण्यात येईल.

२) मालमत्ता फर्निचर आणि फिक्स्चर्सशिवाय "जशी आहे जेथे आहे आणि जशी आहे जे आहे" स्थितीवर विक्री करण्यात येईल.

३) लिलावातील मालमत्तेची वर उल्लेखिलेल्या दिनांक आणि वेळेस पाहणी करता येईल. मालमत्तेची पाहणी किंवा निविदा सादरीकरणाशी संबंधित कोणत्याही शंका असल्यास कृपया वरिष्ठ व्यवस्थापक/ मुख्य व्यवस्थापक - कोकण मर्कन्टाईल को-ऑप. बँक लि., १ ला मजला, हार्बर क्रेस्ट, माझगाव टी.टी., मुंबई - ४०००१०. दूरध्वनी : ९८२०५४७७००/९८२०४६४२६४ यांना संपर्क साधावा.

४) इच्छुक खरेदीदार वरील मालमत्तेकरिता त्यांचे प्रस्ताव मोहोरबंद पाकिटात इसारा रक्कम अनामत (इरअ) च्या डिमाण्ड ड्राफ्टसह वरिष्ठ व्यवस्थापक, कोकण मर्कन्टाईल को-ऑप. बँक लिमिटेड, १ ला मजला, हार्बर क्रेस्ट माझगाव, टी. टी. मुंबई - ४०००१० यांच्या कार्यालयात दि. १५.०७.२०२३ रोजी किंवा त्यापूर्वी पाठवावा. मोहोरबंद पाकिट दि. २७.०७.२०२३ रोजी स. ११ वाजता विक्रीच्या वेळेस प्राधिकृत अधिकाऱ्यांतर्फे १ ला मजला, हार्बर क्रेस्ट माझगाव, टी. टी. मुंबई - ४०००१० येथे उपलब्ध इच्छुक बोलीदार, कर्जदार, गहाणवटदार आणि जामिनदार यांच्या उपस्थितीमध्ये उघडण्यात येईल.

५) योग्यरित्या न भरलेले प्रस्ताव किंवा सशर्त प्रस्ताव किंवा इरअ न जोडलेले प्रस्ताव किंवा यामध्ये विहीत वरील दिनांक आणि वेळेस न प्राप्त झालेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत /वैध मानले जाणार नाहीत आणि त्यानुसार फेटाळण्यात येतील. इसारा रक्कम अनामत वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

६) प्रस्ताव कागदपत्रांसोबत, इच्छुक बोलीदाराने केवायसी कागदपत्रांची (पॅनकार्ड आणि पत्त्याचा पुरावा) प्रत देखील जोडावयास हवी.

७) कोणत्याही परिस्थितीमध्ये मालमत्ता राखीव किंमतीच्या खाली विक्री करण्यात येणार नाही.

८) प्रतिभूती धनको म्हणजेच कोकण मर्कन्टाईल को-ऑप. बँक लि. द्वारे बोली स्वीकारण्यास अधीन राहून उच्चतम बोलीदार/प्रस्तावदारास मालमत्तेची विक्री केली जाईल. तथापि, आवश्यक असल्यास अंतर्गत बोली, जी त्याच ठिकाणी, दिनांक आणि वेळेस घेण्यात येतील, करु देण्यास मंजूरी देण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकारांना आहे.

९) लिलाव/अंतर्गत बोली त्याच ठिकाणी घेण्यात येईल जेव्हा इच्छुक बोलीदार उपस्थित असतील आणि त्यांचे प्रस्ताव थेट सादर करतील आणि त्यांचे प्रस्ताव वाढवतील.

१०) सदर मालमत्तेच्या संदर्भातील सर्व देणी आणि थकबाकी म्हणजेच महापालिका कर, देखभाल/ सोसायटी प्रभार, वीज आणि पाणी कर किंवा इतर कोणतीही देणी व सर्व थकीत देणी यशस्वी बोलीदार/ खरेदीदाराने भरावयाची आहेत.

११) यशस्वी बोलीदार/खरेदीदाराने खरेदी किंमतीच्या २५% रक्कम (यापूर्वीच भरलेले इ.र.अ. समायोजित करून) प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे विक्रीशी संबंधित प्रस्तावाचा स्वीकार केल्यापासून २ कामकाजांच्या दिवसांमध्ये लगेचच भरावयाची आहे. असे न केल्यास इसारा रक्कम अनामत जप्त केली जाईल.

१२) विक्री किंमतीची उर्वरित ७५% रक्कम प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे यशस्वी खरेदीदारास विक्री निश्चिती कळविल्यापासून १५ दिवसांच्या आत भरावयाची आहे. विक्री किंमतीची शिल्लक ७५% रक्कम किंवा त्याचा कोणताही भाग विहीत कालावधीमध्ये भरण्यास अयशस्वी झाल्यास जमा केलेली रक्कम जप्त केली जाईल, आणि प्रतिभुती कर्जदारास सदर मालमत्तेची पुन्हा विक्री करु शकतात आणि थकबाकीदार खरेदीदार मालमत्तेचे किंवा खरेदीकरिता यापूर्वी भरलेल्या रकमेच्या कोणत्याही भागावरील सर्व दावे सोडून द्यावे लागतील.

१३) विक्री सुरक्षित धनकोद्वारे मंजुरीच्या अधीन असेल.

१४) वर उल्लेखिलेली स्थावर मालमत्ता निम्नस्वाक्षरीकार प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे विक्री निश्चित केल्याच्या दिनांकापासून आग किंवा चोरी किंवा इतर अपघाताद्वारे हानी किंवा नुकसान किंवा इतर धोक्यांसह सर्व बाबतीत यशस्वी खरेदीदाराच्या संपूर्ण जबाबदारीवर असेल. यशस्वी बोलीदार कोणत्याही स्वरुपाच्या कोणत्याही आधारावर वार्षिक विक्रीकरिता पात्र असणार नाही.

१५) सोसायटीची देणी, जर असल्यास, आणि मालमत्तेवरील देणी यासह कोणतीही देय वैधानिक आणि इतर देणी खरेदीदाराने भरावयाची आहेत आणि वर उल्लेखित मालमत्तेकरिता विक्री प्रमाणपत्राच्या नोंदणीकरणाशी संबंधित मुद्रांक शुल्क, नोंदणीकरण शुल्क, हस्तांतरण शुल्क आणि इतर कोणतेही खर्च आणि प्रभार यशस्वी बोलीदाराने भरावयाचे आहेत.

१६) स्वतः इच्छुक बोलीदार/प्रस्तावदार किंवा त्यांनी योग्यरित्या प्राधिकृत केलेला प्रतिनिधी व्यतिरिक्त इतर कोणाराही लिलाव/विक्री प्रक्रियेमध्ये भाग घेऊ दिला जाणार नाही.

१७) प्रतिभूती कर्जदाराने भरलेले सर्व शुल्क, प्रभार आणि खर्चासह सर्व देणी जर उपरोल्लेखित कर्जदार/सह-कर्जदार यांनी लिलावाच्या दिनांकाच्या एक कामकाजाच्या दिवस आधी भरल्यास मालमत्तेची विक्री करण्यात येणार नाही आणि संबंधित बोलीदारांकडून प्राप्त झालेल्या सर्व बोली त्यांना कोकण मर्कन्टाईल को-ऑप. बँक लिमिटेडच्या विरोधातील कोणत्याही दायित्व/दाव्याशिवाय परत करण्यात येतील.

सरफैसी कायदा २००२ च्या नियम ८ (६) अन्वये वैधानिक ३० दिवसांची विक्री सूचना

कर्जदार आणि जामिनदारांना याद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी आजपर्यंतची थकीत असलेली उपरोल्लेखित रक्कम आणि आकस्मिक खर्च आजपासून ३० दिवसांच्या आत भरणा करावेत अन्यथा मालमत्ता विक्रीस ठेवण्यात येईल/विक्री करण्यात येईल आणि शिल्लक देणी जर असल्यास व्याज आणि शुल्कासह वसूल करण्यात येईल.

ठिकाण : रत्नागिरी
दिनांक : १४.०६.२०२३

प्राधिकृत अधिकारी
सही/- कोकण मर्कन्टाईल को-ऑप. बँक लि. करिता